विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीजदर सवलतीबाबत सुधारीत आदेश.

महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१५ /प्र.क्र.२३८/ऊर्जा-५

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ८ मार्च, २०१९.

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१५ /प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दिनांक २९.०६.२०१६

२. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१५ /प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दिनांक २४.०३.२०१७

३. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-२०१५ /प्र.क्र.२३८/ऊर्जा-५ दिनांक २३.११.२०१७

४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र: धोरण-२०१८/प्र.क्र.१६४९ / टेक्स-५ दिनांक २१.१२.२०१८.

<u>प्रस्तावना:</u>

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांच्या वीजदरात सवलत उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १, २ व ३ अन्वये ऊर्जा विभागाव्दारे देण्यात येत आहे. तसेच वस्त्रोद्योग धोरण-२०१८-२३ अंतर्गत शासन निर्णय क्र.४ अन्वये राज्यातील वस्त्रोद्योग घटकांकरिता वीजदर सवलत देण्याची प्रक्रिया सुरु आहे. या दोन्ही विभागाच्या सवलती विदर्भातील वस्त्रोद्योग घटकास दिल्यानंतर त्यांचा परिणामी वीजदर हा कृषी ग्राहकाच्या सवलतीच्या वीजदरापेक्षाही कमी होत आहे असे निदर्शनास आले. या दोन्ही सवलती एकत्रितपणे लागू केल्यास विदर्भ, मराठवाडा विभागाच्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्रातील वस्त्रोद्योगांना असमतोल स्पर्धेस तोंड द्यावे लागेल. उर्वरित राज्यातील काही वस्त्रोद्योग घटक बंद पडतील किंवा विदर्भ, मराठवाडा विभागात स्थलांतरीत होतील व असे व्यावहारिक ठरणार नाही. याशिवाय वस्त्रोद्योग धोरणानूसार वस्त्रोद्योग घटकांनी ऊर्जा संवर्धनाच्या माध्यमातून पुढील तीन वर्षात सौर ऊर्जेवर सदर प्रकल्प चालविणे अपेक्षित आहे. परंतू ऊर्जा व वस्त्रोद्योग विभागाच्या सवलती एकत्रितपणे दिल्यास वस्त्रोद्योग घटकास येणारा परिणामी वीजदर हा रुपये १/- प्रती युनिट पेक्षा कमी होत असल्याने सदर उद्योग अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताव्दारे ऊर्जा निर्मिती करण्यास तयार होणार नाहीत व शासनाचे ऊर्जा संवर्धनविषयक असणारे धोरण सफल होणार नाही अशी बाबही निदर्शनास आली. या अनुषंगाने वस्त्रोद्योग घटकांच्या वीजदरात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्याअनुषंगाने उपरोक्त शासन निर्णय संदर्भ क्र.२ मधील परिच्छेद क्र.२ नंतर खालीलप्रमाणे परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय:</u>

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, डी व डी+ क्षेत्रातील कार्यरत व नवीन वस्त्रोद्योग घटकांना ऊर्जा व वस्त्रोद्योग विभागासह शासनाव्दारे देण्यात येणारी अनुज्ञेय सवलत लागू केल्यानंतर परिणामी वीजदर हा रुपये ३/- प्रती युनिट पेक्षा कमी नसावा तसेच उर्वरित महाराष्ट्रातील कार्यरत व नवीन वस्त्रोद्योग घटकांना वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय दिनांक २१.१२.२०१८ मधील अनुज्ञेय सवलती लागू केल्यानंतर परिणामी वीजदर हा रुपये ४/- प्रती युनिट पेक्षा कमी नसावा. सदर सवलत जानेवारी, २०१९ च्या वीज वापरापासून लागू करण्यात यावी.

२. वरील निर्णयानुसार महावितरण कंपनीने अंमलबजावणी करुन शासनास अहवाल सादर करावा.

३. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०३०८१५२६३३२४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Prashant Pundalik Badgeri

Digitally signed by Prashant Pundalik Badgeri
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ae61ab0caff4e0f24ac492ed7902d55ccf49e93124a5c13271 33a6da9db8c748, serialNumber=ec955e2d360e1fddb6abac58a907419053beeceb5db ac48a78c89c588ff71bef, cn=Prashant Pundalik Badgeri
Date: 2019.03.08 15:29:38 +05'30'

(प्र.पुं. बडगेरी)
शासनाचे उपसचिव

प्रत:

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
७. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व मंत्रालयीन विभाग
१२. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर
१४. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१७. अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. अवर सचिव (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. कक्ष अधिकारी (१४६१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. कक्ष अधिकारी, (व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.